केसरी पुणे, ५ डिसेंबर २०१७/८

# पंख आणि क्विकहील फाऊंडेशनतर्फे शाळांगण उपक्रम

**पिंपरी :** पंख संस्था आणि क्विकहील फाऊंडेशन व रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नवमहाराष्ट्र विद्यालयात शाळांगण प्रकल्पाअंतर्गत मुलांसाठी जाणीव जागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रत्ना सावंत आणि पवन पाटील होते. पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, क्विकहील फाऊंडेशनचे सीएसआर प्रमुख अजय शिर्के, पंखच्या विश्वस्त सीमा ननवरे व नवमहाराष्ट्र विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तमराव पाटील आणि नवमहाराष्ट्र मुलींच्या शाळेच्या मुख्याध्यापिका शारदा जाधव उपस्थित होते.

रत्ना सावंत आणि पवन पाटील यांनी मुलांना छेडछाड, विनयभंग यासंबधीच्या कायद्यांबाबत माहिती दिली. छेडछाड, रॅगिंग, विनयभंग झाल्यास कोणते गुन्हे दाखल होऊ शकतात, काय शिक्षा होऊ शकते व कोणत्या मित्रांपासून लांब राहणे योग्य आहे यासंदर्भात मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.